# कोरोनाव्हायरस

कोरोनाव्हायरस (सीओव्ही) हा व्हायरसचा एक मोठा समूह आहे ज्यामुळे सामान्य सर्दीपासून ते मिडल ईस्ट रेसपायरेटरी सिंड्रोम (एमईआरएस-सीओव्ही) आणि गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम (एसएआरएस-सीओव्ही) सारख्या गंभीर रोगांपर्यंत आजार उद्भवतात. नवीन कोरोनाव्हायरस (एनसीओव्ही) हा व्हायरसचा प्रकार या पूर्वी मानवामध्ये कधीच आढळून आलेला नाही

## सामान्य चिन्हे आणि लक्षणे:

- ताप
- खोकला
- दम लागणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे
- अधिक गंभीर प्रकरणांमध्ये, न्यूमोनिया, गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम आणि मूत्रपिंड निकामी होऊ शकते




## प्रतिबंध:

- अल्कोहोल युक्त हँडवॉश किंवा साबण आणि पाणी वापरुन हात वारंवार स्वच्छ करा
- खोकताना आणि शिंकताना तोंड आणि नाक टिशू पेपरने झाकून घ्यावे - तसेच टिशू ताबडतोब फेकून द्या आणि हात धुवा
- ज्याव्यक्तीस ताप आणि खोकला आहे त्याच्याशी जवळचा संपर्क टाळा
- जर आपल्याला ताप, खोकला आणि श्वास घेण्यास त्रास होत असेल तर लवकर वैद्यकीय सेवा घ्या आणि मागील प्रवास इतिहासा बाबत आपल्या आरोग्य सेवा प्रदात्यास सांगा
- प्राण्यांशी थेट असुरक्षित संपर्क टाळा आणि प्राण्यांच्या संपर्कात असलेल्या पृष्ठभागाचा स्पर्श टाळा.
- कच्चा किंवा न शिजवलेल्या प्राण्यांच्या उत्पादनांचा वापर करणे टाळले पाहिजे. कच्चे मांस, दूध किंवा प्राण्यांचे अवयव काळजीपूर्वक हाताळले पाहिजेत, जेणेकरून, न शिजवलेल्या पदार्थांपासून होणारे दूषित परिणाम टाळता येतील

## उपचार:

2019-एनसीओव्ही संसर्गासाठी कोणतीही विशिष्ट अँटीवायरल उपचार करीता विशिष्ट औषध उपलब्ध नाही. 2019-एनसीओव्हीची लागण झालेल्या रुग्णास लक्षणांची तीव्रता कमी करणारे उपचार दिले जातात तसेच गंभीर प्रकरणांमध्ये, जीवनावश्यक अवयवांच्या कार्यात बिघाड होणार नाही याकडे लक्ष्य दिले जाते .

Reference: www.cdc.gov, https://www.who.int